# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/07/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. उमरेड :– फिर्यादी/पिडीता वय १५ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप क्र. ९८/२०२० कलम ३५४(अ), ३५४(ब) भादवि. सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात यातील पिडीत फिर्यादी ही शाळेतुन परत आपल्या गावी जात असता **आरोपी नामे– दिपक चिंधुजी बारेकर, वय ४४ वर्ष रा. डवा ता. उमरेड** याने पिडीत फिर्यादीजवळ आपली मारोती व्हॅन थांबवली व पिडीतेला तिच्या घरी सोडुन देतो असे म्हणुन मारोती व्हॅनमध्ये आपल्या बाजुच्या सिटवर बसवुन पिडीतेला स्पर्श करुन तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणाचे तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक राठोड मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २४/०७/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. जयस्वाल सा़ो न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व ३०००/–रू दंड, दंड न भरल्यास ०१ महीना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी रश्मी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन मपोहवा/३०९ वनिता सावरकर पो.स्टे. उमरेड यांनी मदत केली आहे.

### अनोळखी पुरूषाचा मृत्यू

पो.स्टे. बुट्टीबोरी :– अंतर्गत मौजा बोरखेडी (रेल्वे) शिवार तारसी फाटयालगत देवीचे मंदीरासमोर येथे दिनांक ०४/०७/२०२३ चे १९.०० वा. पुर्वी एक वेडसर इसम वय अंदाजे ५५ ते ६० वर्ष हा मृत स्थितीत पडलेला आहे. अशा माहितीवरून पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील स्टाफ यांना सदर इसमाचे प्रेत मृत स्थितीत मिळुन आलेले आहे.

**मृतकाचे वर्णन**:– एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५५ ते ६० वर्ष, उंची अंदाजे ५ फुट, रंग सावळा, डोक्याचे व दाढीचे केस वाढलेले काळे पांढरे, अंगात मळकट फाटलेली बनियान व खाली मळकट लंगोट घातलेला.

याबाबत कोणालाही माहिती असल्यास पो.स्टे. बुट्टीबोरी येथे १) पोलीस स्टेशन बुट्टीबोरी दुरध्वनी क्रमांक ०७१०३२६२१३५ २) तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक जगदीश पालीवाल मो. नं. ९९२१३३७२८८ वर कृपया संपर्क साधावा.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जावेद सत्तार शेख, वय ३५ वर्ष, रा. जुनीवस्ती बुट्टीबारी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. बुट्टीबोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जगदीश पालीवाल मो. नं. ९९२१३३७२८८ हे करीत आहेत.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर